जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार

टोकरतलाव रोड, नंदुरबार ता.जि. नंदुरबार

दुरध्वनी क्रमांक : ०२५६४–२१०१५१ ईमेल आयडी : mahdhunansc@aij.gov.in

म.जा.क्र. (रो.व वि.) २२२१/२०२५ दिनांक : १५/०९/२०२५

निविदा

प्रति,

_____

_____

_____

विषय :– म.जिल्हा न्यायालय नंदुरबार व त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयांना पुरविण्यात आलेल्या एकूण ४१ नग Canon LBP246dw लेझर प्रिंटरकरिता ४१ नग कार्ट्रेज खरेदी करणेबाबत...

उपरोक्त विषयांस अनुसरून व मा.प्रमुख, जिल्हा व सत्र न्यायाधीश सो., नंदुरबार यांचे आदेशान्वये कळविण्यात येते की, म.जिल्हा व सत्र न्यायालय नंदुरबार व अधिपत्याखालील तालुका न्यायालयांचे Canon LBP246dw लेझर प्रिंटरकरिता ४१ नग कार्ट्रेज खरेदी करावाचे आहेत.

त्याकरिता नोंदणीकृत विक्रेत्यांकडून सिलबंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहेत. तरी आपण सिलबंद निविदा म.जिल्हा न्यायालय, नंदुरबार टोकरतलाव रोड, नंदुरबार या पत्यावर सिलबंद पाकीटात **दिनांक २२/०९/२०२५** रोजी किंवा तत्पुर्वी **सायं. ५.००** वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करावी. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच सिलबंद पाकिटावर "Quotation for Cartridge of Canon LBP246dw" असे ठळक अक्षरात लिहावे व पाकीटावर **संपूर्ण पत्ता, E-Mail व मोबाईल नंबर** लिहून सादर करावे.

सर्वसाधरण अटी

१. निविदेतील **कार्टेजचा** दर्जा उत्कृष्ट व उच्च प्रतीचा असावा, अन्यथा सदरील **कार्टेज** आपणांस परत करण्यात येतील व **कार्टेज** हे नव्याने तात्काळ बदलून पुनश्च पुरवावे लागेल व त्याचे कुठलेही अतिरिक्त देयक दिले जाणार नाही.

२. सदरील **कार्टेज** पुरविल्यानंतर संबंधीत विभाग प्रमुखचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सदर **कार्टेजचे** देयक सहा.अधिक्षक, रोख व वित्त विभाग यांचेमार्फत पारीत केले जाईल.

३. सदरील **कार्टेज** नंदुरबार जिल्हा न्यायालयात पोहोच करून देण्याची जबाबदारी विक्रेत्यावर राहील.

४. देयकाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर विक्रेत्यास CT-GST पावती देणे बंधनकारक राहील.

५. उपरोक्त पुरवठा सदर कार्यालयात स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत कार्यालयाचे आदेशपत्र मिळाल्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या ०७ दिवसांच्या आंत करावा लागेल. तसेच सदर **कार्टेजचे** उधारीचे देयक **म.जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार** यांच्या नावाने सादर केल्यानंतर देयकाची रक्कम आपणास अदा करण्यात येईल.

६. सदर सिलबंद निविदा खरेदी समिती, जिल्हा न्यायालय नंदुरबार यांचेसमक्ष उघडवितांना आपणास खरेदी समिती नंदुरबार यांचे समक्ष हजर राहणे बंधनकारक राहील, त्याबाबत आपणास कळविण्यात येईल.

७. सदर निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो.नंदुरबार यांचेकडेस राखून ठेवण्यात आला आहे. तसेच सदर पुरवठादार विक्रेत्याने केलेला पुरवठा समाधानकारक नसल्याची तक्रार संगणक विभागामार्फत प्राप्त झाल्यास दरपत्रक कुठल्याही वेळी रद्द करण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो.नंदुरबार यांचेकडून राखून ठेवण्यात येत आहे.

आदेशावरुन,

प्रबंधक 15/9/25

जिल्हा व सत्र न्यायालय, **नंदुरबार**

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार.

२. संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांना जिल्हा न्यायालयाच्या वेबसाईटर अपलोड करणेसाठी